**कौ.हि.म.सं.अ.क्रं. ३१/२०२२**
**ऐश्वर्या वि. प्रमोद**

**<u>निशाणी क्रं. ०३ वर आदेश</u>**
**दिनांक १३.०९.२०२४**

अर्जदाराने निशाणी ०३ प्रमाणे कौटोंबिक हिंसेपासुन स्त्रीयांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार अंतरिम खावटी मिळावी म्हणून अर्ज दाखल केला आहे.

**२.** अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्रं. १ प्रमोद महादेव अकोने हा तिचा पती असुन गैरअर्जदार क्रं. २ व ३ सासु व नणंद आहे. अर्जदार हीचा विवाह दिनांक ०४.०२.२०२१ रोजी सामाजीक रितीरिवाजाप्रमाणे गैरअर्जदार क्रं. १ याचेसोबत झाला असुन तुव्हापासुन ती गैरअर्जदार क्रं. १ ची लग्नाची पत्नी आहे. गैरअर्जदार क्रं. १ याचेपासुन तिला अर्जदार क्रं. २ कु. टिआरा, वय— ८ महीने ही एक मुलगी आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ ते ३ यांचेकडे एकत्र कुटुंबात खडका येथे नांदायला गेली असता सुरवातीला साधारणत: ७ महिने गैरअर्जदारोन तिला व्यवस्थीत वागणुक दिली परंतु त्यानंतर शारीरीक व मानसिक छळ करणे सुरु केले. गैरअर्जदार क्रं. १ हा दारु पिउन घरी येत असे व अर्जदार हीच्या चारीत्रयावर संशय घेउन तिला मानसिक त्रास देत असे. तसेच गैरअर्जदार क्रं. २ व ३ हे घरातील लहान सहान कारणावरुन अर्जदार हीला त्रास देत असत व गैरअर्जदार क्रं. १ यांस अर्जदाराविरुध्द भडकवुन देत असत त्यामुळे गैरअर्जदार क्रं. १ हा अर्जदारास मारहान व शिवीगाळ करीत असे. गैरअर्जदार हे तिला माहेरवरुन पैशे आणण्याकरीता सुध्दा त्रास दयायचे. अर्जदाराने माहेरवरुन पैशे आनण्यास नकार दिल्यास तिला शिवीगाळ करायचे. दिनांक २३.०६.२०२२ रोजी गैरअर्जदार याने अर्जदारास पैशाच्या कारणावरुन मारहान करुन तिला माहेरी आणुन सोडले तेव्हापासुन अर्जदार क्रं. १ व २ यांचेकडे पुर्णत: दुर्लक्ष केले आहे.

**३.** अर्जदार हीला नाईलाजास्तव तिच्या आई वडीलांकडे राहावे लागत आहे. अर्जदार हीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, उलटपक्षी गैरअर्जदार यांचेकडे खडका येथे २.५ एकर व नानबर्डी येथे १०.५ एकर शेती आहे. याशिवाय गैरअर्जदार यांचा मत्सव्यवसाय व दुग्धव्यवसाय आहे तसेच खडका येथे ५ रुमचे मोठे घर आहे. गैरअर्जदार यांस दरमहा सरासरी ५०,०००/— उत्पन्न मिळते त्यामुळे अर्जदार हीला व तिचे मुलीस अंतरिम खावटीपोटी गैरअर्जदार हा दरमहा १०,०००/— सहज देउ शकतो. त्यामुळे अंतरिम खावटी मंजूर करावी अशी अर्जदाराने मागणी केली आहे.

**४.** गैरअर्जदार याने नि. १० नुसार त्यांचा लेखी जबाब दाखल करुन अर्जदार हीचे अर्जातील संपुर्ण मजकूर नाकारला आहे. त्याने केवळ अर्जदार ही त्याची लग्नाची पत्नी असल्याचे व अर्जदार क्रं. २ ही त्याची मुलगी असल्याचे मान्य केले आहे. मात्र शारीरीक व मानसिक छळ केल्याबाबतचा मजकूर खोटा असल्याचे त्याने कथन केले आहे. गैरअर्जदार याने त्याच्यावरील सर्व आरोप खोटे असल्याचे कथन केले आहे. त्याने त्याचेकडे शेती असल्याचे

नाकारले असुन त्याचा मत्सव्यवसाय तोटयात असल्याने बंद पडल्याचे नमुद केले तसेच त्याचेवर कर्ज असुन त्याला दरमहा ३८६२/— रुपये कर्जाचा हप्ता भरावा लागतो व १५ ते २० हजार रुपये महीन्याला घरखर्च करावा लागतो. त्यामुळे अर्जदार हीचा अंतरिम खावटीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्याने मागणी केली आहे. त्याचे कथनानुसार त्याने अर्जदार हीला नांदविण्याकरीता नागपुर न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे व तो अर्जदार हीला नांदविण्यास तयार आहे.

**५.** दोन्ही पक्षाचे वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. त्यांनी त्यांचे अर्जातील व जबाबातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. अर्जदार हीचा अर्ज व गैरअर्जदाराने दाखल केलेला जबाब याचा विचार करता अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ ची लग्नाची पत्नी असुन अर्जदार क्रं. २ ही त्याची मुलगी आहे असे दिसुन येते. तसेच अर्जदार ही दि. २२.०६.२०२२ पासुन माहेरी राहत असुन गैरअर्जदार याने अर्जदार क्रं. १ व २ यांच्या अन्न, वस्त्र व निवा—याची तसेच औषधोपचाराची कोणती व्यवस्था केलेली नाही. गैरअर्जदार याचे जबाबावरुन त्याचा दरमहा २०,००० रुपये खर्च आहे यावरुन त्यास उत्पन्नाचे भरपुर साधन आहे असे दिसुन येते. गैरअर्जदार याने अर्जदार यांचेसोबत असलेले नातेसंबंध मान्य केले असल्याने गैरअर्जदार याची अर्जदार व तिच्या मुलीचे पालनपोषण करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. गैरअर्जदार यांस उत्पन्नाचे भरपुर साधन असुनही त्याने अर्जदाराचे अन्न, वस्त्र निवा—याची व्यवस्था केलेली नसल्याने तसेच मुळ अर्जाच्या निकालास आणखी वेळ लागण्याची शक्यता असल्याने अर्जदार क्रं. १ व २ यांना गैरअर्जदार क्रं. १ याचेपासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो अंतरिम खावटी मंजूर करने न्याय व योग्य होईल. अर्जदार हीला अंतरिम खावटी मंजूर केल्यास गैरअर्जदार याचे कोणतेही नुकसान संभवत नाही तसेच त्याचेवर कोणताही अन्याय होण्याची शक्यता नाही त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्रं. १ यांस आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्रं. १ हीला दरमहा रुपये ३,०००/— व अर्जदार क्रं. २ हीला दरमहा रु. २,०००/— असे एकुण रु. ५,०००/— (रुपये पाच हजार) अर्ज दाखल तारखेपासुन पुढील आदेशापावेतो दयावेत.

३. आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विना मोबदला देण्यात यावी.

सेलू,
दि. १३.०९.२०२४

(एस.डब्ल्यू.शेगोकार)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्याया.क्रं.२), सेलू.